दिनांक ०५/०७/२०२१

**प्रसिध्दी पत्रक**

**आरोपी लोकसेवक शैलेंद्र कृष्णराव भोपे वय-४८ वर्ष व्यवसाय नौकरी कनिष्ठ लिपीक, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय औरंगाबाद यांनी १०,०००/- रु स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद च्या जाळ्यात**

| | | |
|---|---|---|
| आलोसे यांचे नाव व हुद्दा | :- | श्री. शैलेंद्र कृष्णराव भोपे वय-४८ वर्ष व्यवसाय- नौकरी कनिष्ठ लिपीक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय औरंगाबाद. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे जवाहरनगर, औरंगाबाद (शहर.) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागणी रक्कम | :- | १०,०००/- रुपये लाचेची रक्कम |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या गावातील मंगल कार्यालय बांधकामाचा उर्वरीत तीन लाख रुपयाचा चेक मिळवुन देण्यसाठी |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांचे गावी बोरमाळातांडा ता. सोयगाव जि. औरंगाबाद येथील आदिवासी वस्तीतील मंजुर असेलेल्या मंगलकार्यालयाचे बांधकामाचे उर्वरीत तीन लाख रुपयाचा चेक मिळण्यासाठी तक्रारदार यांचेकडे शैलेंद्र भोपे, कनिष्ठ लिपीक, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय औरंगाबाद यांनी १०,०००/- रुपये लाचेची मागणी करत असल्याची तक्रार तक्रारदार यांनी नोंदविली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, शैलेंद्र कृष्णराव भोपे वय-४८ वर्ष व्यवसाय- नौकरी कनिष्ठ लिपीक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय औरंगाबाद यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रुपये लाचेची केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, शैलेंद्र कृष्णराव भोपे वय-४८ वर्ष व्यवसाय- नौकरी कनिष्ठ लिपीक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय औरंगाबाद यांनी १०,०००/- रुपये लाचेची रक्कम चेतक घोडाचौक उल्कानगरी औरंगाबाद येथे स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन, जवाहरनगर औरंगाबाद शहर. येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक मा. मारुती पंडीत, पोलीस उपअधीक्षक श्री. रुपचंद वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. हनुमंत वारे यांनी केली आहे. त्यांना याकामी श्री. संदीप राजपुत पोलीस निरीक्षक, पोना- बाळासाहेब राठोड, पोलीस अमंलदार केवलसिंग घुसींगे, चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

**पोलीस उप अधीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद.**